# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आर.बी.एस.के)

**प्रस्तावना :-**

सन २०१३-१४ रोजी पासुन राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हा मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधण्यासाठी उचललेले अत्यंत महत्वपुर्ण पाऊल आहे. या कार्यक्रमाचा माध्यमातून बालकांच्या आरोग्याची तपासणी व त्यांच्या आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंध घालणे हा मुख्य उद्‌देश समोर ठेवण्यात आला आहे.

**उद्‌देश व उद्‌दिष्टेः-**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची तपासणी करुन मुलांमध्ये आढळणाऱ्या जन्मतः असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वांच्या कमतरते अभावी होणारे आजार व अपंगत्व इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्याचे उद्‌दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**अंमलबजावणी :-**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम या कार्यक्रमाचा लाभ महाराष्ट्र राज्यातील ० ते १८ वर्ष वयोगटातील जवळपास ६.२७ लक्ष मुलांना होणार आहे. अंगणवाडीस्तरावर ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून २ वेळेस होणारी आरोग्य तपासणी हा हया कार्यक्रमाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. या व्यतिरिक्त शासकीय व निमशासकीय शाळेतील ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांनाही या आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ होणार आहे. सदर आरोग्य तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळून आलेल्या आरोग्य विषयक समस्या/अडचणीसाठी योग्य ते संदर्भ सेवा व सर्व प्रकारचे वैद्यकिय व शल्य चिकित्सक उपचार पुरविण्यात येणार आहेत. मुलांवर केले जाणारे उपचार हे पुर्णतः मोफत पुरविण्यात येतील.

**सेवा देणाऱ्या आरोग्य संस्था :-**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची पथके प्रत्येक तालुक्यात नियुक्त करण्यात आलेली आहेत. सदर पथकाचे मुख्यालय, ग्रामीण रुग्णालये किंवा संबंधित उपजिल्हा रुग्णालय हे आहे.

**मनुष्यबळ :-**

यवतमाळ जिल्हात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत एकूण ३९ पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. प्रत्येक पथकात दोन वैद्यकिय अधिकारी (एक पुरुष, एक महिला), एक औषधनिर्माता, एक परिचारिका यांचा समावेश आहे. यापैकी ३८ पथक ग्रामीण भागात व १ पथक नगर परिषद येथे कार्यरत आहेत. तसेच २ आश्रम शाळा पथके आदिवासी भागात कार्यरत आहेत.

**कार्यक्रमांतर्गत विविध योजना व उपक्रम :-**

जिल्हयांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम १ एप्रिल २०१३ पासून राबविण्यात येत आहे. प्रत्येक पथकास १ वाहन, औषधीचे किट, तपासणी साहित्य, इत्यादी पुरविण्यात आल्या आहेत. साहित्य व औषधांची खरेदी विकेंद्रीकरण पध्दतीने तालुकास्तरावर करण्यात आलेली आहे. आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे गावनिहाय वेळापत्रक तयार करुन प्रत्येक पथकास ठराविक वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत व हे वेळापत्रक सर्व अंगणवाडी व शाळा यांना पाठविण्यात आले आहे.

**सद्यस्थिती :-**

- आरबीएसके कार्यक्रमातंर्गत लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रियांकरीता वर्ष २०१५-१६ मध्ये माहे जानेवारी २०१६ अखेर, एकूण ७ राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत संलग्न रुग्णालयांशी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामध्ये करार (MoU) करण्यात आलेला आहे.

- अंगणवाडी स्तर आणि शाळा स्तरांवरुन संदर्भित करण्यात आलेल्या बालकांच्या इतर शस्त्रक्रिया ज्या राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत होत नाहीत, अशा शस्त्रक्रिया डिसेंबर २०१५ पासून हया Indian Association of Pediatric Surgeons, Maharashtra Chapter यांच्या माध्यमातून जिल्हास्तरावरुन पूर्ण करण्यात येत आहेत. या शस्त्रक्रिया करण्यासाठी Indian Association of Pediatric Surgeons, Maharashtra Chapter चे बालरोग शल्यचिकित्सक, भूलतज्ञ आणि मदतनीस यांचा समावेश असून त्याना अनुक्रमे रु.५०००/-, रु.३०००/- आणि रु.२०००/- असे मानधन आरबीएसके अंतर्गत मंजुर अनुदानातून देण्यात येते. यामध्ये साधारणपणे Orthopedic, Hernia, Hydrocoele, Cleft Lip Palate, Squint/Catract, Dental Surgeries, ENT इत्यादी प्रामुख्याने आढळून येणाऱ्या शस्त्रक्रिया पूर्ण येत आहेत. सद्य:स्थितीत जिल्हामध्ये प्राप्त अहवालानुसार या पध्दतीने शस्त्रक्रिया करुन घेण्यासाठी एकूण ६१३ मुले प्राप्त असून त्यापैकी ४१२ शस्त्रक्रिया हया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलेल्या आहेत, त्याची टक्केवारी ६७% आहे.

- संदर्भित करण्यात आलेल्या बालकांना विविध तज्ञांमार्फत उपचार देवून त्या बालकांचे बौध्दिक, मानसिक आणि शारिरीक स्थितीचा विकास साधला जातो. तसेच या केंद्रामध्ये आवश्यक सर्व प्रकारच्या साहित्य सामुग्रीची खरेदी प्रक्रिया ही जिल्हास्तरावरुन आणि राज्यस्तरावरुन करण्यात आलेली आहे.

- **Health conditions to be screened**

  Child Health Screening and Early Intervention Services under RBSK envisages to cover 30 selected health conditions for Screening, early detection and free management. States and UTs may also include diseases namely hypothyroidism, Sickle cell anaemia and Beta Thalassemia based on epidemiological situation and availability of testing and specialized support facilities within State and UTs.

## Selected Health Conditions for Child Health Screening & Early Intervention Services

| Defects at Birth Deficiencies | Deficiencies |
|---|---|
| 1. Neural tube defect<br>2. Down's Syndrome<br>3. Cleft Lip & Palate / Cleft palate alone #<br>4. Talipes (club foot)<br>5. Developmental dysplasia of the hip<br>6. Congenital cataract<br>7. Congenital deafness<br>8. Congenital heart diseases<br>9. Retinopathy of Prematurity | 10. Anaemia especially Severe anaemia<br>11. Vitamin A deficiency (Bitot spot)<br>12. Vitamin D Deficiency, (Rickets)<br>13. Severe Acute Malnutrition<br>14. Goiter |
| **Diseases of Childhood**<br>15. Skin conditions (Scabies, fungal infection<br>16. Otitis Media<br>17. Rheumatic heart disease<br>18. Reactive airway disease<br>19.Dental conditions<br>20. Convulsive disorders | **Developmental delays and Disabilities**<br>21. Vision Impairment and Eczema)<br>22. Hearing Impairment<br>23. Neuro-motor Impairment<br>24. Motor delay<br>25. Cognitive delay<br>26. Language delay<br>27. Behavior disorder (Autism)<br>28. Learning disorder<br>29. Attention deficit hyperactivity disorder |

| |
|---|
| 30. Congenital Hypothyroidism, Sickle cell anemia, Beta thalassemia (Optional) |

## कार्यक्रमाच्या अहवालाची सद्यःस्थिती :-

राष्ट्रीय बाल स्वास्थ्यक कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील दुष्काळामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या १४ जिल्हयांमध्ये (औरंगाबाद, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, परभणी, बीड, नांदेड, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अमरावती व वर्धा) यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. त्यांचा जिल्हानिहाय माहे फेब्रुवारी २०१६ अखेरचा अहवाल खालीलप्रमाणे आहे

## अंगणवाडी तपासणी :-

अंगवाडी स्तरावर करण्यात येणाऱ्या बालकांची तपासणी वर्षातून दोनवेळा फेज १ आणि फेज २ मध्ये करण्यात येते.

| अ.क्र. | फेज | अंगणवाडी तपासणी | | | ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांची तपासणी | | | एप्रिल २०१५ पासून ० ते ६ वयोगटातील तपासलेल्या बालकांची संख्या | एप्रिल २०१५ पासून ० ते ६ वयोगटातील संदर्भित केलेल्या बालकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट एप्रिल २०१५ ते सप्टे २०१५ | एप्रिल २०१५ पासून तपासलेलया अंगणवाडीची प्रगतीपर संख्याा | तपासलेल्या अंगणवाडीची टककेवारी | उद्दिष्ट एप्रिल २०१५ ते सप्टे २०१५ | एप्रिल २०१५ पासून तपासलेलया अंगणवाडी बालकांची प्रगतीपर संख्याा | तपासलेल्या अंगणवाडीची टककेवारी | | |
| १ | फेज -१ | २८५२ | २८५२ | १००% | २०४७६४ | २०७२०१ | ८६% | १८२६६ | ११४८ |
| २ | फेज -२ | २८५२ | २८५२ | ७४% | २४५८०४ | १३००२४ | ५३ % | १४२१९ | १३०८ |

## शालेय आरोग्य तपासणी :-

महाराष्ट्र राज्यामध्ये एप्रिल ते जुन या महिन्यांच्या कालावधी दरम्यान सर्व शाळांना उन्हाळी सुट्टया असतात. यास्तव या काळात आरबीएसके पथकांमार्फत शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येत नाही

## *१ एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत आरबीएसके शाळा तपासणी अहवाल*

| अ. क्र. | जिल्हयांची नावे | शालेय तपासणी | | | शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी | | | एप्रिल २०१५ पासून किरकोळ आजारावर उपचार केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | एप्रिल २०१५ पासून संदर्भित केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यां ची संख्या (ग्रारु व इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिद्ष्ट एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ | एप्रिल २०१५ पासून तपासलेल्या शाळांची संख्या (प्रगती पर) | एप्रिल २०१५ पासून तपा सलेल्या शाळांची टक्के वारी | उद्दिष्ट एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ | एप्रिल २०१५ पासून तपासलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (प्रगतीपर) | एप्रिल २०१५ पासून तपास लेल्या विद्यार्थ्यांची टककेवा री | | |
| ११ | यवतमाळ | २८३१ | २८१३ | १००% | ३८१३३९ | ३६४३०४ | ९६% | ३८५१५ | ३९८० |

## पूर्ण करण्यात आलेल्या हृदय शस्त्रक्रिया :-

### एप्रिल २०१३ पासून ते माच २०१६ पर्यंतचा अहवाल

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | आढळून आलेली बालके | त्यापैकी शस्त्रक्रिया करण्यात आलेली बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ११ | यवतमाळ | २५७ | ११३ | ४४ |

### एप्रिल २०१५ ते माच २०१६पर्यंतचा अहवाल

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | आढळून आलेली बालके | त्यापैकी शस्त्रक्रिया करण्यात आलेली बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ११ | यवतमाळ | ७५ | २२ | ३० |

## पूर्ण करण्यात आलेल्या इतर शस्त्रक्रिया :-

### इतर शस्त्रक्रियेचा एप्रिल २०१३ पासून ते माच २०१६ पर्यंतचा अहवाल

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | आढळून आलेली बालके | त्यापैकी शस्त्रक्रिया करण्यात आलेली बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ११ | यवतमाळ | ६१३ | ४१२ | ६७ |

### इतर शस्त्रक्रियेचा एप्रिल २०१५ ते माच २०१६ पर्यंतचा अहवाल

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | आढळून आलेली बालके | त्यापैकी शस्त्रक्रिया करण्यात आलेली बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ११ | यवतमाळ | १२० | ८३ | ९६ |

### IAPS (Pediatric Surgeon) द्वारे करण्यात आलेल्या शस्त्रक्रियांचा अहवाल :-

| जिल्हयांची नावे | आढळून आलेली बालके | त्यापैकी शस्त्रक्रिया करण्यात आलेली बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|
| यवतमाळ | ११ | ७ | ६४ |